14 MAR 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा दीक्षान्त सोहळा १९ ला

## कुलगुरू डॉ. शिंदे : किरणकुमार प्रमुख पाहुणे; दोन दिवस विविध कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा


ए. एस. किरण कुमार

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त सोहळा सोमवारी (ता. १९) विक्रम साराभाई डिस्टिंग्विश्ड, इस्रोचे प्रोफेसर ए. एस. किरणकुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यंदाचे राष्ट्रपती सुवर्णपदकासाठी कोल्हापुरातील प्रियंका राजाराम पाटील; तर कुलपतीपदकासाठी सातारा येथील दीक्षा विजय मोरे यांची निवड केली. लोककला केंद्रात सकाळी ११ वाजता होणाऱ्या कार्यक्रमात २४ हजार २४५ स्नातकांना पदव्या बहाल करण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

दीक्षान्त सोहळ्यानिमित्त १९ व २० ला ग्रंथमहोत्सवासह सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. कार्यक्रमास इस्रो इंडियन स्पेस रीसर्चचे अध्यक्ष ए. एस. किरणकुमार यांची उपस्थिती राहणार आहे. ते भारतीय अवकाश शास्त्रज्ञ (इंडियन स्पेस सायंटिस्ट) म्हणून सुपरिचित आहेत. 'चंद्रयान, मंगळयान' याचबरोबर परदेशांत अनेक महत्त्वाच्या वैज्ञानिक साधनांचा विकास केला. २०१४ मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित केले. संशोधनपर लेख प्रसिद्ध करून त्यांनी या क्षेत्रासाठी ज्ञाननिर्मिती केली आहे. विविध विषयांत संशोधन केलेल्या २७९ विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रदान करण्यात येणार आहे. विविध क्षेत्रांत पारितोषिक प्राप्त केलेल्या १०७ विद्यार्थ्यांना १७० पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे. मंगळवारी सायंकाळी पाचनंतर सांकृतिक कार्यक्रम लोककला केंद्रात होणार आहे. यात मुंबई व कोल्हापुरातील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विद्यार्थी, पालकांच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्थाही केल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव बी. डी. नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. नमिता खोत, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

### ग्रंथ महोत्सव

ग्रंथ महोत्सवास सोमवारी सकाळी नऊ वाजता सुरुवात होणार आहे. नामवंत भारतीय, परदेशी कंपनीचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजिटल ग्रंथांच्या ५० स्टॉलचा यात समावेश आहे. हे स्टॉल १९ व २० मार्च या दोन्ही दिवशी सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत खुले असतील.



### ५०,४४४ पदव्या

दीक्षान्त सोहळ्यात ५० हजार ४४४ स्नातकांना पदव्या बहाल करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी ८२ बूथ उभे करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना लघुसंदेश पाठवून त्यांचा बूथ क्रमांक कळविण्यात येणार आहे. काही अडचण आल्यास विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पीआरएन क्रमांकाद्वारे विद्यार्थ्यांना माहिती दिली जाणार आहे.

### ग्रंथ दिंडी

सोमवारी (ता. १९) सकाळी कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. यात विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. ग्रंथदिंडी जनता बझार-राजारामपुरी मेन रोड, आईचा पुतळा मार्गे शिवाजी विद्यापीठात जाईल.

### पीएच.डी. पदवी

विविध विषयांत संशोधन केलेल्या पीएच.डी. पदवी प्राप्त केलेल्या स्नातकांची संख्या २७९ आहे. त्यांपैकी ४३ एकूण स्नातक व्यासपीठावर व २३६ स्नातकांना व्यासपीठाव्यतिरिक्त पदवी बहाल करण्यात येणार आहे.

# प्रियंका पाटील यांना राष्ट्रपती सुवर्णपदक


प्रियंका पाटील

कोल्हापूर, ता. १३ : गतवर्षीच्या शैक्षणिक क्षेत्रासह क्रीडा, बौद्धिक, कला क्षेत्र, एन.सी.सी., एन. एस.एस. यांमध्ये गुणवत्ता; तसेच व्यक्तिमत्त्व, शारीरिक आरोग्य, भाषाशुद्धता, सर्वसाधारण वर्तणूक व नेतृत्वगुण प्राप्त केलेल्या प्रियंका राजाराम पाटील यांना राष्ट्रपतीपदक जाहीर झाले. मंगळवारी (ता. १९) त्यांना हे पदक इस्रो, विक्रम साराभाई डिस्टिंग्विश्डचे प्रोफेसर ए. एस. [illegible] येणार आहे.

करवीर तालुक्यातील शिरोली दुमाला येथे प्रियंका पाटील यांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण झाले. दहावीला ८२ टक्के, तर बारावीलाही ८० टक्के गुण मिळवून त्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. येथील महावीर महाविद्यालयात बी.ए.,बी.एड. केले. [illegible] नुकतेच त्यांना शासनाने युवा पुरस्काराने सन्मानित केले.

प्रियंका पाटील या 'सकाळ'चे उपसंपादक सुजित पाटील यांच्या पत्नी आहेत. पतीसह सासर-माहेरच्या मंडळींच्या पाठिंब्यावर मला सर्वश्रेष्ठ राष्ट्रपती पदक मिळाले. हे यश म्हणजे मी आतापर्यंत केलेल्या कष्टाचे चीजच म्हणावे लागेल. मला सहकार्य केलेल्या सर्वांची मी ऋणी आहे, अशी प्रतिक्रिया प्रियंका पाटील [illegible]

# दीक्षा मोरे यांना कुलपती पदक


दीक्षा मोरे

कोल्हापूर, ता. १३ : एमए. संस्कृत विषयामध्ये सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजची विद्यार्थिनी दीक्षा विजय मोरे यांना कुलपती पदक जाहीर झाले. मंगळवारी (ता. १९) त्यांना हे पदक इस्रो, विक्रम साराभाई डिस्टिंग्विश्डचे प्रोफेसर ए. एस. किरणकुमार यांच्या हस्ते देण्यात येणार आहे.

वाई येथील शेतकरी कुटुंबातील [illegible] प्रोत्साहनावर शिक्षणास सुरुवात केली. संस्कृत विषयात एमए. पदवी घेऊन इतरांना संस्कृत शिकवावे, अशी इच्छा काकांनी त्यांच्याकडे व्यक्त केली. काकांची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्या बारावीनंतर विज्ञान शाखा सोडून कला शाखेकडे वळल्या. गंगापुरी (सातारा) येथून छत्रपती शिवाजी कॉलेजमधून [illegible] घेतले. कॉलेजमधील प्राध्यापक, ग्रंथालयातील पुस्तकांच्या आधारे त्यांनी अथक परिश्रमातून संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळवून हे यश संपादन केले. विवाहानंतर सध्या त्या पुण्यात राहात आहेत. नेट-सेटचा अभ्यास सुरू असून, लवकरच त्यात यश मिळवून प्राध्यापक बनायचे आणि विद्यार्थ्यांना संस्कृत शिकवून काकांची इच्छा पूर्ण करण्याचे माझे स्वप्न असल्याची प्रतिक्रिया दीक्षा मोरे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
महाराष्ट्र टाईम्स  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2018

# ५० हजार विद्यार्थी घेणार पदवी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ५४ व्या दीक्षान्त समारंभाच्यानिमित्ताने यंदा एकूण ५० हजार, ४४४ स्नातकांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. सोमवारी १९ रोजी विद्यापीठाच्या लोककला केंद्राच्या सभागृहात सकाळी ११ वाजता पदवीदान कार्यक्रम होणार आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ ए. ए. किरणकुमार या समारंभाचे प्रमुख पाहुणे आहेत. त्यांच्या उपस्थितीत २४ हजार, २४५ स्नातक प्रत्यक्ष पदवी स्वीकारणार असून २६ हजार, १९९ स्नातकांना घरपोच पदवी प्रमाणपत्र पाठवण्यात येणार आहेत. यंदा पदवीप्राप्त मुलींची संख्या २६ हजार, ९३८ तर मुलांची संख्या २३ हजार ५०६ इतकी आहे.

## ए. एस. किरणकुमार यांचा अल्पपरिचय



किरणकुमार हे भारतीय अवकाश शास्त्रज्ञ म्हणून परिचित आहेत. अहमदाबाद येथील स्पेस ॲप्लिकेशन सेंटर येथून त्यांनी शास्त्रज्ञ म्हणून संशोधन कार्याची सुरुवात केली. त्यांनी ऑप्टिकल सिस्टिम ग्रुप, भारतीय आंतरिक्ष संशोधन केंद्रातील संशोधनपूरक उपक्रम यासारख्या अनेक मोहिमांचे नेतृत्व केले आहे. चंद्रयान व मंगळयान यासह परदेशात अनेक महत्त्वाच्या वैज्ञानिक साधनांचा विकास केला आहे. चांद्रयान एक या प्रकल्पामध्ये अंतरीक्ष यानात वापरल्या गेलेल्या टेरेन मॅपिंग कॅमेरा व हायपर स्पेक्ट्रल प्रतिमा या महत्त्वाच्या साधनांची निर्मिती करणाऱ्या चमूचे नेतृत्व किरणकुमार यांनी केले आहे.

## यंदा डी. लिट् पदवी नाही

व्यवस्थापन परिषद व अधिकार मंडळातील सर्व सदस्यांची नियुक्ती होईपर्यंत दीक्षान्त सोहळ्याचे नियोजन झाले होते. परिणामी डी. लिट. पदवीबाबत निर्णय व्यवस्थापन परिषद व अधिकार मंडळातील सदस्यांची चर्चा होऊ शकली नाही, अशी माहिती परीक्षा मूल्यमापन संचालक महेश काकडे यांनी दिली.

## यंदा पदवीधरांमध्ये मुलींची बाजी; २७९ स्नातकांना पीएचडी

विविध विषयांमध्ये संशोधन अभ्यासक्रम पूर्ण करून पीएचडी पदवी प्राप्त केलेल्या एकूण २७९ स्नातकांना दीक्षान्त सोहळ्यात पीएचडी पदवी प्रदान करण्यात येणार आहे. यापैकी ४६ स्नातकांना व्यासपीठावर पदवी स्वीकारण्याची संधी मिळणार आहे. यावर्षी विविध विषयातील विशेष प्राविण्यासाठी देण्यात येणाऱ्या १०७ विद्यार्थ्यांना १७० पारितोषिक व्यासपीठावर प्रदान करण्यात येणार आहेत तर एकूण १४२ विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. पदवी प्रमाणपत्र वितरण बुधवर सकाळी साडेसात ते सकाळी साडेदहा व दुपारी एक ते सायंकाळी साडेसहा यावेळेत सुरू राहणार आहे. दीक्षांत समारंभादिवशी प्रत्यक्ष पदवी प्रमाणपत्र घेणाऱ्या स्नातकांना देण्यात येणारी पदवी प्रमाणपत्र दुरुस्तीचा अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. १४ मार्चपासून दीक्षांत कार्यक्रमासंदर्भातील सूचना मेसेजच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोबाइलफोनद्वारे कळवण्यात येणार आहेत.

दीक्षान्त समारंभानिमित्त १९ व २० रोजी ग्रंथ महोत्सवाचे आयोजन केले आहे. १९ रोजी सकाळी साडेसात वाजता ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. राजारामपुरी येथील कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडी व पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या दिंडीत शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजना, छात्रसेना विद्यार्थी, ग्रंथालयाचे समन्वयक सहभागी होणार आहेत. कमला कॉलेज, राजारामपुरी, आईचा पुतळा, सायबर चौकमार्गे पुन्हा दीक्षांत मंडपात ग्रंथदिंडी येईल. सकाळी ९ वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. सायंकाळी पाच वाजता होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सवात सहभागी झालेले विद्यार्थ्यांचे संघ, तसेच मुंबई विद्यापीठातील विद्यार्थी कलाकार सहभागी होणार आहेत.

# ५० हजार पदवी, २७९ पीएचडी



म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ५४ व्या दीक्षान्त समारंभात सोमवारी (ता.१९) ५० हजार, ४४४ स्नातकांना पदवीप्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. तर २७९ स्नातकांना पीएचडी पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

### पदवीप्रमाणपत्रे स्वीकारणारे विद्यार्थी

- एकूण स्नातक : ५०,४४४
- विद्यार्थी : २३,५०६
- विद्यार्थिनी : २६,१९९

- प्रत्यक्ष प्रमाणपत्र स्वीकारणारे स्नातक : २४,२४५
- विद्यार्थी : ११,५४२
- विद्यार्थिनी : १२,७०३

- घरपोच प्रमाणपत्र स्वीकारणारे स्नातक : २६,१९९
- विद्यार्थिनी : ११,९६४
- विद्यार्थिनी : १४,२३५



- पीएचडी पदवी स्वीकारणारे स्नातक : २७९
- प्रत्यक्ष पदवी स्वीकारणारे स्नातक : ४६
- बूथद्वारे पदवी स्वीकारणारे स्नातक : २३६
- पारितोषिके स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या : १४२

### शाखानिहाय पदवीधारकांची संख्या

| शाखा | प्रत्यक्ष | घरपोच | एकूण |
|---|---|---|---|
| सामाजिक शास्त्र (संलग्न) | ३३ | ७ | ४० |
| सामाजिक शास्त्र | ३६९८ | ४४६९ | ८१६७ |
| शिक्षणशास्त्र (संलग्न) | १० | ३ | १७ |
| शिक्षणशास्त्र | ३६६ | ५६१ | ९२७ |
| आर्ट व फाइन आर्ट (संलग्न) | ११ | ० | ११ |
| आर्ट व फाइन आर्ट | १९९२ | २८७५ | ४८६७ |
| विज्ञान | ५३९३ | ५५७८ | १०९७१ |
| विज्ञान (संलग्न) | ८८ | २१ | १०९ |
| विज्ञान | ८ | २ | १० |
| वाणिज्य | ५६०० | ५६०४ | ११२०४ |
| वाणिज्य (संलग्न) | १५ | ७ | २२ |
| अभियांत्रिकी व तंत्रज्ञान | ६६२८ | ६७६८ | १३३९६ |
| विधीशास्त्र | २४६ | १७५ | ४२१ |
| विधीशास्त्र | १५६ | १११ | २६७ |
| मेडिसीन | ० | ४ | ४ |
| आयुर्वेदिक व होमिओपॅथीक मेडिसीन | १ | १४ | १५ |

14 MAR 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ सोमवारी

## प्रमुख पाहुणे इस्रोचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ शास्त्रज्ञ अलुरू सिलीन किरण कुमार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ सोमवारी १९ मार्च रोजी होणार आहे. इस्रोचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ शास्त्रज्ञ अलुरू सिलीन किरण कुमार हे दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावर्षी एकूण ५० हजार ४४४ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. सकाळी ११ वाजता प्रमुख पाहुणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील, तसेच प्राधिनिधिक स्वरूपात १०७ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रेही प्रदान करणार आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठातर्फे यावर्षी एकूण ५० हजार ४४४ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. यापैकी २४ हजार २४५ विद्यार्थी प्रत्यक्ष पदवी घेणार आहेत. शिवाय २६ हजार १९९ विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच पदवी प्रमाणपत्रे पाठवली जाणार आहेत. तर २७९ स्नातकांना पीएच. डी. पदवी प्रदान केली जाणार आहे. यापैकी ४३ स्नातकांना व्यासपीठावर पदवी प्रदान केली जाणार आहे. प्रत्येक विषयातील प्रथम निकाल घोषित झालेल्या १०७ विद्यार्थ्यांना १७० पारितोषिकें व्यासपीठावर मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात येणार आहे. राष्ट्रपती सुवर्णपदक शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागातील विद्यार्थीनी प्रियंका पाटील यांना तर कुलपती पदक सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमधील एम. ए. संस्कृत विषयाची विद्यार्थीनी दीक्षा मोरे यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन समितीचे संचालक महेश काकडे यांनी दिली.



ज्येष्ठ शास्त्रज्ञ अलुरू सिलीन किरण कुमार

- ▸प्रियंका पाटील यांना राष्ट्रपती सुवर्णपदक
- ▸दीक्षा मोरे यांना कुलपती पदक
- ▸कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यापीठाच्या सल्लागार समितीचे डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगले, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर उपस्थित होते.



**ग्रंथमहोत्सव**

शिवाजी विद्यापीठ दिक्षांत समारंभाचे औचित्य साधून सोमवारी १९ मार्च रोजी सकाळी ७.३० वाजता ग्रंथ दिंडीचे आयोजन केले आहे. सकाळी ९ वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

### प्राध्यापक होऊन सामाजिक सेवा करण्याचे स्वप्न : प्रियंका पाटील



महाविद्यालयीन जीवनापासूनच अभ्यासाबरोबर सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदवला. निसर्ग मित्र, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे, वृध्दाश्रमाला सहकार्य करणे यासह अन्य सामाजिक कार्य करते. तसेच शिवप्रेमी सखी मंचची स्थापना करून काम सुरू केले आहे. सध्या विद्यापीठात गुणवत्ता यादीत माझा सातवा क्रमांक असून, आतापर्यंत अनेक पुरस्कार मिळाले आहेत. राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाल्यामुळे भविष्यात चांगले काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

### संस्कृत पंडित होण्याचे स्वप्न : दीक्षा मोरे



संस्कृत विषयात पारंगत व्हायचे म्हणून संस्कृत विषय घेतला. छत्रपती शिवाजी कॉलेजमधील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि ग्रंथालयातील पुस्तकांचा अभ्यास यामुळेच या विषयात पहिली आले. मिळालेल्या कुलपती पदकाने माझी जबाबदारी वाढवली असून, मला संस्कृत पंडित व्हायचे आहे.

14 MAR 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा सोमवारी

## पद्मश्री ए. एस. किरण कुमार यांची प्रमुख उपस्थिती, ५०,४४४ स्नातकांना पदवी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ सोमवार, दि. १९ मार्च २०१८ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात होणार असून, या समारंभासाठी इस्रोचे माजी अध्यक्ष पद्मश्री प्रा. ए. एस. किरणकुमार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दीक्षांत सोहळ्याला २३ हजार ५०६ पुरुष, २६ हजार ९३८ महिला स्नातकांना पदवी बहाल केली जाणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार बैठकीत दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू शिंदे म्हणाले, विद्यापीठाचा ५४ व्या दीक्षांत समारंभात एकूण ५० हजार



प्रा. ए. एस. किरणकुमार

४४४ पदव्या स्नातकांना बहाल करण्यात येणार आहेत. यातील २४ हजार २४५ स्नातक या दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणार आहेत. या दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ इस्रोचे माजी अध्यक्ष पद्मश्री प्रा. ए. एस. किरणकुमार हे उपस्थित राहणार आहेत. या समारंभात विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातील एम.ए.मधील विद्यार्थिनी प्रियांका राजाराम पाटील हिला राष्ट्रपती सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात येणार आहे, तर संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल छत्रपती शिवाजी कॉलेज साताऱ्याच्या दीक्षा विजय मोरे हिला कुलपती मेडलने सन्मानित करण्यात येणार आहे.

परीक्षा नियंत्रक महेश काकडे म्हणाले, एकूण २७९ स्नातकांना पीएच.डी. पदवीने सन्मानित करण्यात येणार असून, यातील ४३ स्नातकांना व्यासपीठावर पदवी बहाल करण्यात येणार आहे. या दीक्षांत समारंभाची सुरुवात १९ मार्च रोजी सकाळी ८ वाजता कमला कॉलेज इथून ग्रंथ दिंडीने होणार आहे. दीक्षांत समारंभाचा मुख्य सोहळा सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या लोककला केंद्रात मान्यवरांच्या उपस्थित होणार आहे. सकाळी ७.३० वाजल्यापासून १०.३० वाजेपर्यंत आणि मुख्य सोहळा संपन्न झाल्यानंतर दुपारी दीड वाजल्यापासून सायंकाळी साडेसहा वाजेपर्यंत स्नातकांना पदव्या वितरित करण्यात येणार आहेत. संबंधित विद्यार्थ्यांना एसएमएसच्या माध्यमातून कळविण्यात आले असून, विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या लिंकवरून पत्र घेऊन ओळखपत्र सादर केल्यानंतर पदवी दिली जाणार आहे. या दिवशी २४ हजारांहून अधिक पदव्या वितरित करण्यात येणार असून त्याची तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

या पत्रकार बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर आदींसह विद्यापीठ पदाधिकारी उपस्थित होते.

### सांस्कृतिक पर्वणी

दीक्षांत सोहळ्यानिमित्त सोमवारी सायंकाळी ५ वाजता विद्यार्थी विकास विभागातर्फे लोककला केंद्र येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमामध्ये पोवाडे, कव्वाली यासह विविध लोककला सादर केल्या जाणार आहेत. या कार्यक्रमामध्ये मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थीही सहभागी होणार आहेत.

### यंदा डी.लिट. पदवी नाही

व्यवस्थापन परिषद व अधिकार मंडळातील सर्व सदस्यांची नियुक्ती होईपर्यंत दीक्षांत सोहळ्याचे नियोजन झाले होते. परिणामी, डी.लिट. पदवीबाबत निर्णय व्यवस्थापन परिषद व अधिकार मंडळातील सदस्यांची चर्चा होऊ शकली नाही. त्यामुळे या वर्षी दीक्षांत सोहळ्यात होणारा डी.लिट. पदवी प्रदान कार्यक्रम होणार नाही, अशी माहिती परीक्षा मूल्यमापन संचालक महेश काकडे यांनी दिली.

### ग्रंथमहोत्सवाचे आयोजन

दरम्यान, दीक्षांत समारंभानिमित्त १९ आणि २० मार्च या कालावधीत विद्यापीठ प्रांगणात ग्रंथ महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. या ग्रंथ महोत्सवात पन्नासहून अधिक स्टॉल उभारण्यात येणार आहेत, अशी माहिती ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी या पत्रकार बैठकीत दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 MAR 2018 पुढारी

# शिवाजी विद्यापीठ दीक्षांत समारंभाची तयारी पूर्ण

## प्रियंका पाटील यांना राष्ट्रपती सुवर्ण तर दीक्षा मोरेला कुलपतींचे पदक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ सोमवारी (दि.१९) सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात सकाळी अकरा वाजता होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून 'इस्त्रो'चे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ ए. एस. किरणकुमार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. इतिहास विभागाच्या प्रियंका पाटील यांना यंदाचे राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले तर कुलपतींचे पदक साताऱ्यातील छत्रपती शिवाजी कॉलेजच्या दीक्षा विजय मोरे यांना मिळाले. दीक्षांत समारंभाची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती मंगळवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.


ए. एस. किरणकुमार


प्रियंका पाटील


दीक्षा मोरे

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, दीक्षांत समारंभाला जवळपास तीस हजारांहून अधिक विद्यार्थी-पालकांची गर्दी असते. त्यामुळे याबाबतचे काटेकोर नियोजन पूर्ण झाले आहे. यावेळी ग्रंथमहोत्सवाच्या समन्वयक डॉ. नमिता खोत म्हणाल्या, यंदा १९ मार्च रोजी सकाळी साडेसात वाजता कमला कॉलेज येथीन ग्रंथदिंडीस सुरुवात होईल. सकाळी नऊ वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. तर सायंकाळी पाच वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. ग्रंथ महोत्सव दोन दिवस असणार आहे. परीक्षा नियंत्रक महेश काकडे म्हणाले, स्नातकांना पदवी वाटपाचे नियोजन सुक्ष्मरीत्या करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना सहज पदवी घेता यावी यासाठी विविध विभाग करण्यात आले आहेत.

### इंजिनिअरिंगमध्ये सर्वाधिक पदवी

विद्यापीठ कार्यक्षेत्रात १३३९६ इतक्या सर्वाधिक पदवी इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यानंतर वाणिज्य अभ्यासक्रमासाठी ११२०४ व शास्त्र अभ्यासक्रमासाठी १०९७१ इतक्या विद्यार्थ्यांना पदवी मिळणार आहे. कला अभ्यासक्रमासाठी हेच प्रमाण ४८६७ इतके आहे.

14 MAR 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ : सोमवारी ५४ वा दीक्षान्त समारंभ; वाईच्या दीक्षा मोरे हिला कुलपती पदक

# प्रियांका पाटील यांना 'राष्ट्रपती सुवर्णपदक'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त समारंभ सोमवारी (दि. १९) सकाळी अकरा वाजता होणार आहे. विद्यापीठातील लोककला केंद्रातील या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अवकाश शास्त्रज्ञ ए. एस. किरणकुमार उपस्थित असतील.



ए. एस. किरणकुमार

यावर्षी विद्यापीठातर्फे राष्ट्रपती सुवर्णपदकाने शिरोली पुलाची (ता. हातकणंगले) येथील प्रियांका पाटील हिला, तर कुलपती पदकाने वाई (जि. सातारा) येथील दीक्षा विजय मोरे हिला सन्मानित केले जाईल. ५० हजार ४४४ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे पदवी केली जातील, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी मंगळवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, या दीक्षान्त समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणारे ज्येष्ठ अवकाश शास्त्रज्ञ ए. एस. किरणकुमार हे 'इस्रो'चे माजी अध्यक्ष आहेत. त्यांचा 'चांद्रयान : एक' आणि 'मंगळयान' या मोहिमांत सहभाग होता.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक काकडे म्हणाले, सन २०१७-१८ मध्ये कला, क्रीडा, बौद्धिक या क्षेत्रांसह एनसीसी, एनएसएस यांतील गुणवत्ताप्राप्त तसेच व्यक्तिमत्त्व, वर्तणूक व नेतृत्वगुण यांबाबतचे विद्यापीठाच्या सर्वसाधारण कौशल्यासाठीच्या राष्ट्रपती सुवर्णपदकाची मानकरी ठरलेली प्रियांका पाटील ही विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात एम. ए.च्या द्वितीय वर्षात शिकत आहे.

तिला राज्य शासनाचा युवा पुरस्कार गेल्या वर्षी मिळाला आहे. एम. ए. संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळवून 'कुलपती पदक' पटकविणारी दीक्षा मोरे ही साताऱ्यातील छत्रपती शिवाजी कॉलेजची विद्यार्थिनी आहे. या पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, आदी उपस्थित होते.

### ग्रंथमहोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम

दीक्षान्त समारंभानिमित्त बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे सोमवारी (दि. १९) आणि मंगळवारी (दि. २०) ग्रंथमहोत्सवाअंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत, अशी माहिती महोत्सवाच्या समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी दिली.

याअंतर्गत सोमवारी सकाळी साडेसात वाजता ग्रंथदिंडी आणि सकाळी नऊ वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. सायंकाळी पाच वाजता लोककला केंद्रात सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.



शिक्षणाबरोबरच कला-क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची आवड होती. माझ्या विवाहानंतर अशा उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मला मोठ्या प्रमाणात मिळाली. गेल्यावर्षी मला राज्य युवा पुरस्कार मिळाला होता. यानंतर आता विद्यापीठाचे सर्वोच्च पदक असलेले राष्ट्रपती सुवर्णपदक मला जाहीर झाल्याचा खूप आनंद होत आहे. माझे माहेर शिरोली दुमाला आहे. माझ्या यशात वडील राजाराम आणि पती सुजित पाटील यांच्यासह कुटुंबीय, शिक्षकांचे पाठबळ मोठे आहे.

**- प्रियांका पाटील**



संस्कृत विषयाची मला पहिल्यापासून आवड होती. त्यामुळे एम. ए.साठीही हाच विषय घेतला. अभ्यासातील सातत्यामुळे या विषयात मला सर्वाधिक गुण मिळाले. यासाठी छत्रपती शिवाजी कॉलेजमधील ग्रंथालयातील पुस्तकांचा आधार घेतला. विद्यापीठातर्फे कुलपती पदक जाहीर झाल्याने खूप आनंदी आहे. या यशामध्ये कुटुंबीयांसह शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले.

**- दीक्षा मोरे**



### २७९ स्नातकांना पीएच. डी.

यावर्षी विद्यापीठातर्फे एकूण २७९ स्नातकांना पीएच. डी. पदवी प्रदान केली जाईल. त्यांतील ४३ जणांना व्यासपीठावर पदवी दिली जाणार आहे. त्यासह १०७ विद्यार्थ्यांना १७० पारितोषिकांचे वितरण केले जाणार आहे, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक काकडे यांनी सांगितले.

14 MAR 2018 महाराष्ट्र टाईम्स
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रियांका पाटीलला राष्ट्रपती सुवर्णपदक

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

दीक्षान्त समारंभात देण्यात येणारे राष्ट्रपती सुवर्णपदक यंदा विद्यापीठातील इतिहास विभागात एम. ए. भाग दोनमध्ये शिकणाऱ्या प्रियांका राजाराम पाटील हिने पटकावले. प्रियांका पाटील ही महाराष्ट्र टाइम्सची कॉलेज क्लब रिपोर्टर असून विविध विषयांवर तिने लेखनही केले आहे.

सक्षम 'मी'

बी.ए. बी.एड्च्या दुसऱ्या वर्षाला असतानाच शिरोली येथील सुजित पाटील यांच्याशी तिचा विवाह झाला. त्यानंतरही शिक्षण पूर्ण करत विविध उपक्रमांत ती अग्रभागी होती. सुजित आणि आजेसासरे तुकाराम पाटील यांच्या पाठिंब्यामुळे उच्चशिक्षण पूर्ण करण्याबरोबरच शिवाजी विद्यापीठातर्फे राष्ट्रपती सुवर्णपदकावर नाव कोरण्याची किमया प्रियांकाने करून दाखवली आहे.

अनेक मुलींच्या आयुष्यात शिक्षण थांबवून विवाहाचा निर्णय हा पूर्णविराम ठरणारा असतो. मूळची शिरोली दुमाला येथील प्रियांकाच्याबाबतीतही हेच वळण आले. शालेय शिक्षण शिरोली येथे तर महाविद्यालयीन शिक्षण महावीर कॉलेज येथे तिने पूर्ण केले. शेतकरी कुटुंबातील प्रियाकांच्या वडिलांची आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्यामुळे बी.एड् पूर्ण होण्याआधीच तिचा शिरोली पुलाची येथील सुजित पाटील यांच्याशी विवाह झाला. त्यानंतर शिकताना कला, क्रीडा, एनसीसी, एनएसएस यासह व्यक्तिमत्व विकास, संशोधन यामध्ये प्रियांकाने यश मिळवले. गेल्या वर्षी तिला राज्य सरकारच्या क्रीडा व युवक कल्याण मंडळाचा राज्य युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



**यापुढेही उत्कृष्ट कामगिरी करून यशाच्या पायऱ्या सर करायच्या आहेत. राष्ट्रपती सुवर्णपदक हे आजपर्यंत आपण केलेल्या कष्टाचे फळ आहे. ही कौतुकाची थाप भावी वाटचालीस आपल्याला प्रेरणादायी राहील. भविष्यामध्ये प्राध्यापक होऊन तरुणांना चांगली दिशा देण्याचे काम करण्याची इच्छा आहे.**

**- प्रियांका पाटील,** राष्ट्रपती सुवर्णपदक विजेती

## दीक्षा मोरे हिला कुलपती पदक



एम. ए. अभ्यासक्रमा अंतर्गत संस्कृत विषयामध्ये सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजच्या दीक्षा मोरे या विद्यार्थिनीला कुलपतीपदक देऊन गौरवण्यात येणार आहे. या पुरस्काराने संस्कृत या विषयासाठी घेतलेल्या कष्टाचे चीज झाल्याची प्रतिक्रिया दीक्षा हिने दिली.


14 MAR 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात तेरा टक्के पाणी

## बांध तयार करण्यास सुरुवात; नवीन विहीरही खोदणार



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जलाशयाची सध्याची स्थिती. (छाया : एस. अली)

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाला जलसमृद्ध करण्याची मोहीम तीन वर्षांपासून सुरू आहे. पावसाळ्यात विद्यापीठातील सर्व पाणीसाठे पूर्ण क्षमतेने भरले होते. नियमितचा वापर आणि वाढलेले ऊन यामुळे सध्या विद्यापीठातील जवळपास १३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. या उन्हाळ्यात पाणीसाठा वाढविण्यासाठी बांध तयार केले जात आहेत, तर नवीन विहीरही खोदली जात आहे.

गेल्या काही वर्षांत शिवाजी विद्यापीठाने विद्यापीठास जलसमृद्ध बनविण्याची मोहीम हाती घेतली आहे. विद्यापीठातील पाणीसाठ्यात वाढ झाली असून, परिसरातील भूजल पातळीमध्येही वाढ झाली आहे. विद्यापीठाच्या या कामामुळे विद्यापीठाची ओळख जलसमृद्ध विद्यापीठ अशी बनली आहे. विद्यापीठाच्या जलसंधारणाच्या कामाची दखल अनेक आंतरराष्ट्रीय

▶▶ पान २ वर

## विद्यापीठात तेरा टक्के पाणी

पातळीवरही घेण्यात आली आहे. विद्यापीठ जलसमृद्ध बनल्याने पाणी बाहेरून विकत घेण्याचे विद्यापीठाने बंद केले आहे. त्यामुळे विद्यापीठाची जवळपास ७० लाखांची बचत झाली आहे. पिण्यासह इतर वापरासाठी विद्यापीठातील जलाशयांचे पाणी वापरण्यात येते. गेल्या काही दिवसांपासून कडक उन्हाळा सुरू झाला आहे. हा कडक उन्हाळा आणि नियमित वापर यामुळे विद्यापीठाच्या जलाशयात जवळपास १३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. यामध्ये २५ कोटी लीटर पाणीसाठा क्षमता असलेल्या भाषा भवन मागे असणाऱ्या जलाशयात सध्या २.५ कोटी लीटर पाणीसाठा आहे, तर ३ कोटी लीटर पाणी साठवणूक क्षमता असलेल्या संगीतशास्त्र विभागामागील जलाशयात सध्या ७५ लाख लीटर पाणीसाठा शिल्लक आहे. विद्यापीठातील सर्व विहिरी पूर्ण क्षमतेने भरलेल्या आहेत. नियमित उपसा होऊनही त्या विहिरी भरलेल्याच आहेत. यामध्ये सुतार विहिरीचा पाणीसाठा ४ लाख लीटर आहे, क्रीडा अधिविभागातील विहिरीचा पाणीसाठा ४.८७ लाख लीटर आहे, रसायनशास्त्र अधिविभागात विहीर ३ लाख लीटर, सिंथेटिक ट्रॅक शेजारील विहीर ५ लाख लीटर, शिंदे विहीर ३ लाख लीटर, गतवर्षी पुनरुज्जीवन करण्यात आलेली विहीर ५ लाख लीटर.

दरम्यान, विद्यापीठाचा पाणीसाठा गेल्या तीन वर्षांत टप्प्या-टप्प्याने वाढत आहे. गेल्या वर्षी तीन शेततळी तयार करून तसेच विहिरीचे पुनरुज्जीवन करून पाणीसाठा वाढविण्यात आला होता. या वर्षी आणखी पाणीसाठा वाढविण्यासाठी विद्यापीठात बांध घालण्यास सुरुवात केली आहे, तर जलाशयाकडे पाणी घेऊन जाणाऱ्या चरींचीही स्वच्छता केली जात आहे. या वर्षी आणखी एक विहीर खोदण्याची तयारी विद्यापीठाने केली आहे. त्यास काही दिवसांत सुरुवात केली आहे.

14 MAR 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अहिल्याबाई होळकर मुत्सद्दी, कणखर होत्या

## – डॉ. चंद्रकांत अभंग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

माळव्याच्या जहागीरदार असलेल्या होळकर घराण्याच्या अहिल्याबाई होळकर अतिशय मुत्सद्दी, धोरणी, उत्तम प्रशासक आणि कणखर भूमिका घेणाऱ्या तत्त्वज्ञानी राणी होत्या, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. चंद्रकांत अभंग यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासन, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'राजमाता अहिल्याबाई होळकर-जीवन व कार्य' या विषयावर दोनदिवसीय परिसंवादाचे आयोजन विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामध्ये करण्यात आले होते. या परिसंवादाच्या उद्‌घाटनप्रसंगी उद्‌घाटक व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. चंद्रकांत अभंग बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. बी. राजगे होते.



कोल्हापूर : अहिल्यादेवी होळकर अध्यासन आणि छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'राजमाता अहिल्याबाई होळकर-जीवन व कार्य' या विषयावर बोलताना ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. चंद्रकांत अभंग.

डॉ. चंद्रकांत अभंग म्हणाले, खंडेराव होळकर १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईमध्ये धारातीर्थी पडल्यानंतर सासरे मल्हारराव होळकरांनी अहिल्याबाईंना सती जाण्यापासून रोखले. त्यांचे मतपरिवर्तन केले. प्रशासकीय व सैन्याच्या कामात त्यांना मल्हाररावांनी निपुण केले होते. १७५४ नंतर अहिल्याबाईंनी रसद पुरवठा अधिकारी म्हणून कार्य केलेले आहे. नोव्हेंबर १७६१ मध्ये मांगरूळ भकवाडा येथील आठ गावे आपल्या ताब्यात यावी म्हणून लढाईला सुरुवात झाली. अहिल्याबाई तातडीने तोफा, बैला अन्य युद्धसामग्री पाठविण्याचे व्यवस्थापन केले. रामपुरा, भांडपुरा या भागामध्ये तोफांचे कारखाने उभारले. अहिल्याबाईंकडे सैनिकी पोषाखामध्ये स्त्रियाही होत्या.

राघोबांनी ज्यावेळेस अहिल्याबाईंवर आक्रमणाची तयारी केली त्यावेळेस इतर मराठा सरदारांनी अहिल्याबाईंचा पक्ष घेतला आणि राघोबांना माघारी फिरावे लागले. महादजी शिंदे, तुकोजी शिंदे हे समवयस्क असूनही अहिल्याबाईंना मातोश्री म्हणून संबोधत होते. इंग्रजांच्या धोक्याकडे लक्ष वळविण्याचे मोठे काम अहिल्याबाईंनी केलेले होते. लाखोरीच्या युद्धाआधी भारताच्या इतिहासामध्ये युरोपियन पद्धतीने झालेले त्या पहिल्या युद्धामध्ये शिंदेंचा विजय झाला होता. यावेळीही अहिल्याबाईंची दूरदृष्टी कामी आली होती. अहिल्याबाईंनी उत्तर, पूर्व, पश्चिम भारतामधील निरनिराळ्या ठिकाणच्या नदीघाट आणि मंदिरे येथे पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. हे त्यांचे कार्य लक्षात घेण्यासारखे आहे.

आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ. ए. बी. राजगे म्हणाले, अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. अहिल्यादेवींनी अनेक मंदिरे व नदीघाट बांधले किंवा त्यांचा जीर्णोद्धार केला. महेश्वर व इंदूर या गावांना त्यांनी सुंदर बनवले. अहिल्याबाईंनी रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. कारागीर, मूर्तिकारांना त्यांनी सन्मान दिला. प्रास्ताविक इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. एन. डी. पारेकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. निलांबरी जगताप यांनी करून दिला. डॉ. निलीशा देसाई यांनी आभार मानले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. यशपाल धिंडे, विनयाताई करपेकर, दशरथ पारेकर, डॉ. अवनिश पाटील, छाया राजे यांच्यासह प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2018
पुढारी

# मुलाखत तंत्र आत्मसात केल्यास यश निश्चित

## डॉ. मोरे : विद्यापीठ दूर शिक्षण केंद्रातर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्पर्धात्मक युगात मुलाखत तंत्र आत्मसात करताना पूर्व तयारी, सकारत्मक दृष्टिकोन ठेवल्यास यश निश्चित मिळेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राच्या वतीने राजर्षी शाहू सिनेट सभागृह येथे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूर शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे होते.

डॉ. मोरे म्हणाले, मुलाखतीला जाताना आकर्षक बायोडेटा, विषयातील सविस्तर ज्ञान आवश्यक आहे. यासह विशेष प्रावीण्य असणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी महत्त्वाच्या मुद्द्यावर आधारित तयारी केली पाहिजे मुलाखत तंत्र आत्मसात करणारा विद्यार्थीच आयुष्य यशाला गवसणी घालू शकेल.

प्रा. डॉ. अनुसे म्हणाले, मुलाखतीचे तीन टप्पे असतात. त्यामध्ये बायोडेटा, गट चर्चा, आणि मुलाखत तंत्र यांचा समावेश होतो. यांची योग्य सागंड घातल्यास मुलाखत यशस्वीरीत्या देता येते. प्रास्ताविक डॉ. नितीन सोनजे यांनी परिचय समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी तर सूत्रसंचालन क्रांती कांबळे व सारीका ववेर यांनी तर समन्वयक डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी वैयक्तिक माहिती या विषयावर मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 MAR 2018

पुण्यनगरी

# रंकाळा तलाव, विद्यापीठ परिसराचा डीपीआर करा

## जैवविविधता समितीच्या बैठकीत महापौरांचा आदेश

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
महाराष्ट्र शासनाकडून निधी मिळवण्यासाठी रंकाळा तलाव, शिवाजी विद्यापीठ परिसराचा डीपीआर तातडीने तयार करून शासनास सादर करा, असे आदेश महापौर स्वाती यवलुजे यांनी दिले. जैवविविधतेच्या बैठकीत अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या.

प्रारंभी पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. 'जैव विविधता समितीसाठी स्वतंत्र बजेट हेड निर्माण करून ५ लाखांची तरतूद चालू आर्थिक वर्षात करण्यात येणार आहे. मागील बैठकीच्या इतिवृत्तास अनुसरून जैवविविधता समितीच्या उपसमित्या स्थापन केल्या आहेत.'

आयुक्त डॉ. अभिजित चौधरी म्हणाले, पर्यावरण अभियंत्यांना जैवविविधता नोंदवही नियमित नोंद करा. पुढील बैठकीपूर्वी संबंधित माहिती रजिस्टरमध्ये नोंद करा. रंकाळा तलावाच्या काठावर कोणीही भर टाकल्यास त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात येईल. महापालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी जैवविविधतेबाबत जागृतीसाठी मार्गदर्शन शिबिर घेण्यात येणार आहे. हुतात्मा उद्यान येथे फुलपाखरांसाठी बटरफ्लाय झोन विकसित करून नागरिकांना पाहण्यासाठी खुला करण्यात येणार आहे. अग्निशमन विभागास अहिंसक पद्धतीने पोळे काढण्यासाठी आवश्यक तो ड्रेसकोड उपलब्ध करत आहे.

नगरसेविका सुरमंजिरी लाटकर म्हणाल्या, महावीर गार्डनमधील मच्छालयात विविध जातीचे मासे उपलब्ध करावेत. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर हरित पट्ट्यामध्ये करावा. शहरातील मधमाश्यांची पोळी शास्त्रोक्त पद्धतीने काढण्यात यावीत.

गटनेता शारगंधर देशमुख म्हणाले, रंकाळ्यावर अमृत योजनेंतर्गत हरित पट्ट्यामध्ये लावण्यात येणारे वृक्ष हे थिम पद्धतीने असावी, जेणेकरून पक्षी, किटकांना पोषक वातावरण निर्माण होईल. त्या ठिकाणी थिम करताना गावठी आंबा, जांभूळ, गुलमोहर व इतर दुर्मीळ वृक्षांची लागवड करावी.

यावेळी सदस्य अमर जाधव, केएमटीचे वाहतूक निरीक्षक आर. एस. धुपकर, जैवविविधता मंडळ महाराष्ट्र शासन सदस्य डॉ. एन. डी. जाधव, सदस्य उदय गायकवाड, सदस्य अनिल चौगुले यांनी सूचना केल्या. मत्स्य विभागाच्या अमिता कोळेकर, पशुधन विकास अधिकारी डॉ. एस. ए. बांदिकर, बागा अधीक्षक प्रभाकर कांबळे, जनसंपर्क अधिकारी मोहन सूर्यवंशी, प्राथमिक शिक्षण विभागाचे प्रतिनिधी बाळासाहेब कांबळे, शाखा अभियंता आर. के. पाटील, कनिष्ठ अभियंता अनुराधा वांडरे, सहा. उद्यान अधीक्षक मधुकर डोंगरे व कर्मचारी उपस्थित होते.

### नगरसेवक करणार २१ रोजी पाहणी

शहरातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, वृक्षप्रेमी, पर्यटकांना जैवविविधतेंतर्गत दुर्मीळ प्रजाती पाहण्यासाठी केएमटीमार्फत दर रविवारी खास बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच २१ मार्चला सर्व कमिटी सदस्यांसह पदाधिकारी व सर्व नगरसेवक दुर्मीळ वृक्ष पाहणीसाठी या बसने जाणार असल्याचेही महापौर यवलुजे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2018
तरुण भारत

# अलोक जत्राटकर अध्यक्षपदी, सतीश ठोंबरे उपाध्यक्षपदी

**कोल्हापूर :** पब्लीक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या (पीआरसीआय) पुणे येथे झालेल्या बाराव्या जागतिक जनसंपर्क परिषदेत कोल्हापूर चॅप्टरच्या नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. चॅप्टरच्या अध्यक्षपदीा शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पीआरसीआय ची १२वी जागतिक जनसंपर्क परिषद पुण्यात हॉटेल शांताई येथे नुकतीच झाली. परिषदेत पीआरसीआयचे मुख्य प्रवर्तक एम.बी. जयराम आणि राष्ट्रीय अध्यक्ष बी.एन. कुमार यांनी कोल्हापूर चॅप्टरच्या कार्यकारिणीची घोषणा केली. याची कार्यकारिणी अशी अध्यक्ष– आलोक जत्राटकर, उपाध्यक्ष– सतीश ठोंबरे (वरिष्ठ व्यवस्थापक, समृद्धी समूह, सांगली), खजिनदार– राजेश शिंदे (संचालक, मीडियाटेक, कोल्हापूर), सचिव– रावसाहेब पुजारी (संपादक व प्रकाशक, तेजस प्रकाशन, कोल्हापूर).